# ई - निविदा सुचना
# जिल्हा परिषद, वर्धा
# ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
# ई-निविदा सुचना क्रमांक- ८/२०२६-२७

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, वर्धा अंतर्गत जिल्हा परिषद, बांधकाम विभागातील नोंदणीकृत स्थापत्य कंत्राटदाराकडुन खालील कामाचे पाणी टंचाई सन २०२६ योजनेकरीता ई-निविदा अंतर्गत ऑनलाईन ब-१ निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदेची सविस्तर माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दिनांक ----/----/२०२६ पासून कोरी निविदा संच विक्रीकरीता उपलब्ध आहे.

| अ. क्र | कामा चे नांव | कामाची किंमत | बयाना रक्क्म १% | निविदा संचाची किंमत (ना-परतावा) | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **मौजा आपटी ता. देवळी** येथिल नळ पाणी पुरवठा योजनेचे विशेष दुरुस्तीचे काम करणे. | ₹ ११,८१,९४५/- | ₹ १२०००/- | ₹ १००० | वर्ग V-A व त्या वरिल | **३० जुन २०२६** |

## निविदा अटी व शर्ती

- **लिफाफा क्रमांक -१ सादर करावयाची दस्ताऐवज**

१.निविदा प्रपत्राची रक्कम व बयाना रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध Gate Way Online Payment Service व्दारे जमा भरणा करणे आवश्यक राहील.

२.जिल्हा परिषद,बांधकाम विभागातील योग्य वर्गातील स्थापत्य कंत्राटदाराचे अद्ययावत पंजीयन प्रमाणपत्र.

३.व्यवसाय कर भरणा केल्याबाबतचे सन २०२५-२६ प्रमाणपत्र जोडणे बंधकारक आहे.

४.आयकरा संबंधीत पॅनकार्ड, आयकर परतावा विवरणपत्र आर्थिक वर्ष सन २०२३-२४,२०२४-२५ व २०२५-२६ (कर निर्धारण वर्ष २०२४-२५,२०२५-२६ व २०२६-२७)

**-(तसेच ज्या कंत्राटदारांचे पंजीयन मागील तिन वर्षाचे आतील असून नवीन नोंदणी आहे अश्या कंत्राटदरांनी नोंदणीच्या वर्षा पासूनचे आयकर भरणा केल्याचे विवरणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.)**

५.कंत्राटदाराचे GST नोंदणी प्रमाणपत्र व ३१/०३/२०२६ पर्यंतचे GSTR३B चे विवरण स्व-साक्षांकित करुन ऑनलाईन सादर करणे बंधणकारक आहे.

६.ई-निविदेसोबत जोडलेली (Upload) केलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे खरी असल्याबाबतचे तसेच कोणत्याही शासकिय निमशासकिय खाजगी संस्थेत कंत्राटदाराचे नाव काळया यादीत समाविष्ठ नसल्याबाबतचे रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.(सत्यप्रतिज्ञापत्राचा नमुना परिशिष्ट-२ सदर निविदा सुचनेसह देण्यात येत असुन सदर नमुन्यातच सत्यप्रतिज्ञापत्र सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.)

७.कंत्राटदाराने सन २०२०-२१,२०२१-२२,२०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षातील केलेल्या कामांचे ३१ मार्च अखेर पर्यंतचे आर्थिक उलाढालीसंबंधात सनदी लेखापाल यांचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

सदर प्रमाणपत्रात नमुद असलेली वार्षिक उलाढाल हि केवळ स्थापत्य अभियांत्रिकी कामाचे उलाढाली संबंधी असावी) (परिशिष्ट- १ नुसार सादर करावे.)

८.चालु वित्तीय वर्षात हाती घेण्यात आलेल्या कामांचा work in hand/work done विवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे (परिशिष्ट-१ नुसार सादर करावे)

**९.पाणीपुरवठा योजना दुरुस्ती करण्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता/समकक्ष अधिकाऱ्याचे स्वाक्षरीणे सादर करणे आवश्यक आहे..(परिशिष्ट ३ नुसार विहीत नमुन्यात सादर करावा)**

- **लिफाफा क्र.२ (Finanical Bid) दराबाबतचा लिफाफा.**

लिफाफा क्र.१ (तांत्रिक लिफाफा)मधील कागदपत्रे (Content) स्विकृत झाल्यानंतर लिफाफा क्र. २ उघडण्यात येवुन कंत्राटदारांनी भरलेला निविदेचा देकार वाचण्यात येईल.

शासन परिपत्रक क्रमांक सीएटी / २०१७ / प्र.क्र.०८ / इमा-२ दिनांक-२६.११.१८ नुसार L१ निविदाधारकाने अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम डी.डी./एफ.डी.आर./बी.जी चे स्वरुपात लिफाफा क्रमांक-२ उघडल्यानंतर आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, वर्धा यांचेकडे जमा करण्यात यावा.त्याची कार्यपध्दती खालील प्रमाणे राहील.

१. १% पर्यंत कमी दराची निविदा सादर केल्यास अतिरिक्त परफॉर्मन्स सुरक्षा निधी सादर करण्याची आवश्यकता नाही.
२. १/-१% ते १०% कमी दरापर्यंत निविदा असल्यास १% अतिरिक्तसुरक्षा रक्कम.
३. १५% पर्यंत कमी दरापर्यंत (१५% - १०%=५%)
४. १५% पेक्षा जास्त कमी दराची निविदा भरल्यास उर्वरित रक्कमेसाठी २ पटीने धनाकर्षाद्वारे (DD)
५. सादरकरणे अनिवार्य आहे.

### निविदेच्या सर्वसाधरण अटी व शर्ती

१. सुरक्षा रक्कम:- सुरक्षा रक्कम निविदा किंमतीच्या किंवा निविदा स्विकृत किंमतीच्या (त्यापैकी जी जास्त असेल) ४% राहील त्यापैकी १% निविदा भरतेवेळी,१% कार्यारंभ आदेशाचे वेळी व उर्वरीत २% चालु देयकातुन कपात करण्यात येईल.
२. निविदाधारकाने १०% पेक्षा कमी दराची निविदा भरल्यास सदर कमी दराबाबत समर्थनिय स्पष्टीकरण सादर करावे लागेल.
३. निविदा मंजुर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत मुंबई मुद्रांक शुल्क १९५८ चे नियमानुसार रक्कमेचे स्टॅम्प पेपरसह सादर करावे लागेल.
**४.** ई-निविदेसोबत जोडलेली (Upload) केलेली सर्व कागदपत्रे / प्रमाणपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपर वरती Affidavit करुन लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे. (परिशिष्ट-५ नुसार सादर करावे.) निविदा उघडल्या नंतर सादर केलेले कागदपत्रे / प्रमाणपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निदर्शनास आल्यास त्यास पुर्णपणे कंत्राटदार स्वत: जबाबदार राहतील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी / कर्मचारी यास जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.
५. निविदा सादर केल्याच्या दिनांकापासून ते निविदा उघडण्याचे कालावधीत निविदाकारास शासनाचे कोणत्याही विभागात काम मिळाल्यास त्याबाबतची माहीती निविदा उघडण्यापुर्वी या कार्यालयास कळविणे अनिवार्य राहील.

६. विभागा अंतर्गत निविदा प्रक्रिया पुर्ण झाल्या नंतर निविदा लिफाफा क्र.०२ (व्यापारी लिफाफा) उघडल्या नंतर सर्वात कमी दर असलेल्या निविदाधारकाची निविदा १% किंवा त्यापेक्षाही कमी दराची असल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रकक्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.०८/इमारती-२, दि. २६/११/२०१८ अन्वये अतिरिक्त सुरक्षा निधी घेण्याबाबतची जी तरतुद आहे त्याची तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे परिपत्रक क्रमांक काअ/ जिपव/ ग्रापापुवि/ निविदा/वशि-६३६/ २०२० दिनांक १९/१०/२०२० अन्वये यापुर्वी निर्गमित केलेल्या सुचना प्रमाणे संबंधित कंत्राटदाराने अतिरिक्त सुरक्षा निधी ०८ दिवसाचे आत सादर करावे. विहीत मुदतीत सादर न केल्यास संबंधित कंत्राटदार जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रकक्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.०८/इमारती-२, दि. ०७/०३/२०१९ अन्वयेअतिरिक्तसुरक्षा निधी ची रक्कम कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचे DD/FDR/BG स्वरुपात घेण्यात यावी. तसेच कंत्राटदाराने अतिरिक्तसुरक्षा निधी ची रक्कम बँक गॅरंटी चे स्वरुपात सादर केल्यास सदर बँक गॅरंटीची मुदत कामाचे कालावधी पर्यंत असणे आवश्यक राहील. **कामाचा कालावधी वाढल्यास सदर बँक गॅरंटीची मुदत वाढवून घेण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. अन्यथा वाढीव कालावधी करिता बँक गॅरंटीवर १८% व्याजाने संबंधित कंत्राटाराचे देयकातून वसुली करण्यात येईल.**

७. निविदा लिफाफा क्रमांक १ ची छाननी करतांना कंत्राटदारांनी सादर केलेल्या दस्ताऐवजामध्ये काही त्रुट्या असल्यास किंवा कमी दस्ताऐवज असल्यास अश्या कंत्राटदारास त्या त्रुट्यांची पुर्तता करण्यास एक संधी देण्यात येईल. सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्र. सीएटी-२०१७/प्र.क्र.०८/इमारती-२, दि. १७/०९/२०१९ अन्वये सदर दस्ताऐवज www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर shortfall प्रसिध्द करुन संबंधीत कंत्राटदारा कडून ऑनलाईन मागविण्यात येईल. उपलब्धकरुन दिलेल्या संधीत संबंधितांनी दस्ताऐवज सादर न केल्यास त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

८. **जर एखादा निविदाकार इतर कामांच्या निविदेत सर्व आवश्यक दस्ताऐवजांची पुर्तता करुन निविदा स्पर्धेत पात्र ठरत असेल व काही विशिष्ट कामांचे निविदेत त्यांचे कडे सर्व दस्ताऐवज असतांना सुध्दा निविदेत किंवा शॉर्टफॉल मध्ये केवळ फेर-निविदा होण्याचे दृष्टीने आवश्यक दस्ताऐवजची पुर्तता करीत नसेल, तर अश्या निविदाकारांची अनामत रक्कम जप्त करुन त्यांना निविदा स्पर्धेत अपात्र ठरविण्यात येईल तसेच त्यानंतर त्यांना पुन्हा त्याच कामाचे निविदेत भाग घेण्यास प्रतिबंध करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

९. निविदा समिती सभेत निविदा लिफाफा क्र.१ चे तांत्रिक मुल्यमापन झाल्यानंतर सभेचे इतिवृत्त संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल व सभेचे इतिवृत्त संकेतस्थळावर अपलोड केल्यापासुन ३ कार्यालयीन दिवसा पर्यंतचा अवधी देण्यात येईल. निविदास्पर्धेतील निविदाकारांचे काही आक्षेप असल्यास या ३ कार्यालयीन दिवसाचे कालावधीत त्यांचे आक्षेप सादर करता येईल.

१०. कोणतीही कंत्राटदाराची अट असलेली (सशर्त) निविदा स्विकारण्यात येणार नाही. ती रद्द समजण्यात येईल.

११. मुल्य वृध्दीचे (Price Escalation) कलम लागु राहणार नाही.

१२. काम सुरु करण्यापुर्वी व काम पुर्ण झाल्याचे छायाचित्र सादर करावे. तदनंतर देयकाचे शोधन करण्यात येईल.

१३. वरिल सर्व कामांच्या साहित्याचा गुणनियंत्रक चाचण्या कंत्राटदाराला करुन दयाव्या लागतील. व चाचणी अहवाल देयका सोबत जोडावा लागेल.

१४. निविदेची बी-१ निविदा प्रपत्रातील सर्व अटी व शर्ती ह्या कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१५. सदरचे काम करते वेळी शासनाने दिलेल्या निर्देशा प्रमाणे सर्व अटी व शर्ती कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१६. नियमानुसार देयकातुन आयकर, श्रमिक उपकर, विमा, GST, रॉयल्टी व व इतर आवश्यक कपाती करणे बंधनकारक राहील.

१७. निविदेच्या कोणत्याही मार्गदर्शक सुचना,शुध्दीपत्रक अथवा इतर माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१८. कोणतेही कारण न दाखवता एक निविदा किंवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे किंवा निविदा अटी व शर्ती प्रसंगी अंशत: शिथील करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा यांनी राखुन ठेवला आहे.

१९. अनुदानाच्या उपलब्धते नुसारच कामाचे देयक अदा करण्यात येईल याची नोंद ईच्छुक कंत्राटदारांनी घ्यावी.

२०. निविदा स्विकारण्याच्या अंतीम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफारकरणे अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये निविदाकाराची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल.

२१. कामाची मुदत कामाचा कार्यादेश दिलेल्या तारखेपासुन **३० जुन २०२६ पर्यंत राहील**.

२२. निविदा उघडतांना आवश्यक दस्तऐवजाची कार्यवाही पुर्णकेलेली नसल्यास निविदेची Financial Bid (लिफाफा क्र.२) उघडण्यात येणार नाही.

२३. निविदेची विधी ग्राहाय्यता निविदा उघडण्याच्या तारखेपासुन १२० दिवस राहील.

२४. GST कराचा विचार करुनच दर भरण्यांत यांवे. शासन नियमानुसार देयकाच्या रक्कमेवर कंत्राटदारास GST अदा करण्यात येईल.

२५. वरील कागदपत्रे/ प्रमाणपत्रा व्यतीरिक्त कोणतीही अनावश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्रे सादर करु नये.

२६. सदर निविदा सुचनेसह लिफाफा क्रमांक १ मध्ये सादर करावयाच्या दस्तऐवजाची तपासणी सुची देण्यात आली आहे. तरी इच्छुक निविदाकारांनी सदर तपासणी सुची प्रमाणेच त्यांचे दस्ताऐवज लावावीत जेणे करुन निविदाकारांनी सादर केलेल्या निविदेत तृट्या आढळणार राहणार नाही.

**उपरोक्त सर्व कामांचे सविस्तर निविदा वेळापत्रक**

| Sr.No. | Activitis | Date & Time |
|---|---|---|
| १ | Tender publishing date | Date & time given As per on e-procurement system |
| २ | Documents download start date | |
| ३ | Documents download end date | |
| ४ | Pre-bid meeting date | |
| ५ | Bid submission start date | |
| ६ | Bid submission closing date | |
| ७ | Bid opening date (Technical Bid) | |

**कार्यकारी अभियंता**
**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग**
**जिल्हा परिषद,वर्धा**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,वर्धा**

**तपासणीसुची**

**कामाचे नाव:-**

**कंत्राटदाराचे नाव:-**________________________________________________

| अ.क्र. | अटी व शर्ती नुसार मागविलेल्या कागदपत्रांचीसुची | संलग्न केली असल्यास ✓ असे चिन्हाकिंत करावे. संलग्न केली नसल्यास ✗ असे चिन्हाकिंत करावे |
|---|---|---|
| १ | निविदा फी व बयाना रक्कम १% | |
| २ | जि.प.बांधकाम विभागातील योग्य वर्गातील स्थापत्य कंत्राटदाराचे अद्ययावत पंजीयन प्रमाणपत्र. | |
| ३ | पॅनकार्ड | |
| ४ | GST रजिस्ट्रेशन | |
| ५ | ३१/०३/२०२६ पर्यंतचे GSTR३B चे विवरण | |
| ६ | आयकर परतावा विवरणपत्र आर्थिक वर्ष सन २०२३-२४,२०२४-२५ व २०२५-२६ | |
| ७ | व्यवसाय कर प्रमाणपत्र सन २०२५-२६ | |
| ८ | सनदी लेखापालाचे आर्थिक उलाढालीबाबतचे आर्थिक वर्ष सन २०२०-२१,२०२१-२२,२०२२-२३,२०२३-२४ व २०२४-२५ चे प्रमाणपत्र (परिशिष्ट-१ नुसार) | |
| ९ | चालु वित्तीय वर्षात हाती घेण्यात आलेल्या कामांचा work in hand/work done विवरणपत्र | |
| १० | काळ्या यादीत समाविष्ट नसल्याबाबत व निविदेसोबत जोडलेलीकागदपत्रे/प्रमाणपत्रेखरी असल्याबाबतचे रुपये १००/- चेस्टॅम्प वरिल प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-५ नुसार) | |
| ११ | अनुभव प्रमाणपत्र | |

सदर निविदा सुचनेसह लिफाफा क्रमांक १ मध्येसादर करावयाच्या दस्तऐवजाची तपासणीसुची देण्यात आली आहे. तरी इच्छुक निविदाकारांनी सादरतपासणीसुची प्रमाणेत्यांचे दस्ताऐवज लावावीत जेणे करुन निविदाकारांनी सादर केलेल्या निविदेत तृटया आढळुन येणार नाहीत.

परिशिष्ट-१

CONSOLATEDSTATEMENT OF WORKS DONE / IN PROGRESS /IN HAND

**STATEMENT SHOWING THE LIST OF WORKS DONE / IN PROGRESS / IN HAND DURING THE PERIOD AS SHOWN BELOW IN RESPECT OF**

**M/S**____________________________________________________________

| Sr. no. | Name of work | Amount put to tender | Agree no.& Date | Amount spending during last five years | | | | | Amount of work still remaining to be Executed | Remark whether completed or In progress २०२५-२६ | In case of private work whether copies of agreement are attached |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | Total | | | | | | | | | | |

SIGNATURE OFCONTRACTOR

## <u>परिशिष्ट-२</u>

## नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु.१०० चेस्टॅंप पेपरवर)

### सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी___________________________________ वय __________ राहणार__________________ या सत्यप्रतिज्ञा पत्राव्दारे लिहुन देतोकी, मी________________________________________ ___ ___ __ _ _ _ _ _ _ _ _ _ _ या कामासाठी निविदा सादर करीत आहे.त्या निविदेच्या लिफाफा क्र.१ मध्ये जी कागदपत्रे सादर केली आहेत. ती खरी, बरोबर व पूर्ण आहेत, त्या मध्ये कोणत्याही तृटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रां मध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंड संहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

माझे / माझे संस्थेचे नाव  कोणत्याही शासकिय / निमशासकिय / खाजगी संस्थेचे काळया यादी मध्ये समाविष्ठ नसल्याचे मी शपथपुर्वक सादर करीत आहे. सदर माहितीखोटी आढळ्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

जोडण्यात आलेले सनदी लेखापाल यांचे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्रामध्ये व, वर्क डन व वर्क इन हॅन्ड चे यादीमध्ये सर्व शासकिय / निमशासकिय / खाजगी संस्थेतील सर्व हाती असलेल्या कामांचा समावेश करण्यात आला आहे. सादर केलेली माहीती काही चुकीची, दिशाभूल करणारी ,खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंड संहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

१) जर कंत्राट कालावधी दरम्यान मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचाऱ्यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाला कोणतीही खोटी माहिती किंवा देयका समवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी / बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

२) जरकंत्राट कालावधीदरम्यान आणि कामसंमाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंतसादरकेलेलेकोणतेहीकागदपत्रेखोटी /बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

३) जर काम समाप्ती नंतर दोष दाशित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

कंत्राटदारचीसही / शिक्का

**परिशिष्ट-३**

**-----:कार्यालयाचे नाव:-----**

**पत्ता**

---

पत्र क्र.________________________ दिनांक______________

अनुभव प्रमाणपत्र

- कामाचे नाव:- ____________ _________________ _____________________ ____ ___ _____ ________ __________________ ____________________ _____
- कंत्राटदाराचे नांव:-
- करारनामा क्रमांक व दिनांक :-
- प्राकलन किंमत:-
- करारनामा किंमत:-
- काम पुर्ण करण्याचा कालावधी :-
- कामावरील एकुण प्रत्यक्ष खर्च:-
- काम पुर्ण झाल्याचा दिनांक :-

प्रमाणित करण्यात येते की, श्री / मे.____________________ यांनी वरील प्रमाणे पाणी पुरवठा योजनेचे काम समाधानकारक पूर्ण केलेले असुन कार्यालयीन दस्ताऐवजा नुसार प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**कार्यकारी अभियंता/ समकक्ष**
**अधिकारी यांचे पुर्ण नाव**
**पदनाम**
**कार्यालयाचे नावाचा शिक्का**

टिप:- १) निविदा सुचणेनुसार कामाचे अनुभव प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

Signature Not Verified
Digitally signed by Dhiraj Shrikrushna Parande
Date: 2026.05.15 14:05:56 IST
Location: Maharashtra-MH